महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी अत्यंत उपयुक्त,
दर्जेदार साहित्यसोपी भाषा, क्रमबध्द व आकर्षक मांडणी

# आधुनिक भारताचा आणि महाराष्ट्राचा इतिहास

## REVISION NOTES


*संकलन व लेखक*

**उमेश कुदळे**

(पोलीस उपनिरीक्षक - 2013 बॅच)

महाराष्ट्रातील समाजसुधारक व व्यक्तीविशेष या पुस्तकाचे लेखक



रयत प्रकाशन
अध्ययन • संशोधन • विकास

महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी अत्यंत उपयुक्त,

दर्जेदार साहित्यसोपी भाषा, क्रमबध्द व आकर्षक मांडणी

# आधुनिक भारताचा आणि महाराष्ट्राचा इतिहास

## REVISION NOTES

**वैशिष्ट्ये :**

- परीक्षाभिमुख मांडणी.
- ऐतिहासिक घटना आणि व्यक्तिविशेष दोन्हींचा संक्षीप्त समावेश.
- अभ्यासक्रमाचा आवाका समजून घेवून मुद्यांचा समावेश.
- सादर नोट्स ही एकदिवसीय रिव्हिजन बॅच ला अनुसरून बनवण्यात आलेली आहे. यासाठी त्यासंदर्भात असलेले व्हिडिओ पाहणे फायद्याचे असेल. शेजारी दिलेला QR CODE कोड स्कॅन करून या नोट्स ला अनुसरून असलेले व्हिडिओस पाहू शकतात.


*संकलन व लेखक*

**उमेश कुदळे**

(पोलीस उपनिरीक्षक - 2013 बॅच)

महाराष्ट्रातील समाजसुधारक व व्यक्तीविशेष या पुस्तकाचे लेखक

# आधुनिक भारताचा आणि महाराष्ट्राचा इतिहास

## REVISION NOTES

**संपादक :** उमेश विठ्ठल कुदळे
**Email. :** rayatprakashan@gmail.com

**प्रकाशक :**
**रयत प्रकाशन, पुणे**
पत्ता: 3 रा मजला, बालाजी मंदिर ट्रस्टच्या वरती, फरासखाना पोलिस स्टेशन शेजारी,
अप्पा बळवंत चौक, पुणे-02.
संपर्क क्र. 9762131361
**Email. :** rayatprakashan@gmail.com

**© This is Copyright Content**
सदरील पुस्तकाचे पुर्नरमुद्रण करण्याचे सर्व अधिकार 'कॉपीराईट कायदा 1957' अन्वये लेखकाधिन आहे. त्यानुसार या पुस्तकाचे तसेच यातील कोणत्याही भागाचे किंवा घटकाचे किंवा परिच्छेदाचे कोणत्याही पद्धतीने (स्कॅनिंग करून, छापून, फोटोकॉपी/झेरॉक्स क 352 न इत्यादि) पुर्नरमुद्रण केल्यास सदरील व्यक्ती अथवा संस्थेवर कॉपीराईट कायदा 1957 नुसार योग्य ती कारवाई केली जाईल.

### विशेष सूचना :

**विशेष सुचना : पुस्तकातील माहिती शक्य तितकी अद्ययावत व अचूक देण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही नजरचुकीने काही त्रुटी असल्याने निदर्शनास आणून दिल्यास त्या सुचनांचा पुढील आवृत्तीत अवश्य विचार करु. तसेच पुस्तक वाचताना काही समस्या निर्माण झाल्यास 9762131361 या भ्रमणध्वनी क्रमांकावर कॉल करुन प्रत्यक्ष निराकरण करु शकता. तसेच विविध संकेतस्थळ, विविध संदर्भग्रंथांचा उपयोग करुन पुस्तकाची रचना केली आहे. तरी लेखक, प्रकाशक, विक्रेता सर्व बाबींशी सहमत असेलच असे नाही.**

रयत प्रबोधिनी™
सेवेसाठी ज्ञानार्जन

# अनुक्रमणिका


| क्र. | प्रकरण | पान क्र. |
|---|---|---|
| १. | प्रकरण १ : ब्रिटिश सत्तेची भारतात स्थापना | ०१ |
| २. | प्रकरण २ : ब्रिटिश कालीन कायदे | ०८ |
| ३. | प्रकरण ३ : महत्वाचे गव्हर्नर | १३ |
| ४. | प्रकरण ४ : रयतवारी जमिन महसुल व्यवस्था | १५ |
| ५. | प्रकरण ५ : दळणवळण | १९ |
| ५.१ | प्रकरण ६ : धार्मिक सुधारणा चळवळ | २१ |
| ६. | प्रकरण ७ : शिक्षण | २८ |
| ७. | प्रकरण ८ : राजकीय संघटनांचा इतिहास | ३५ |
| ८. | प्रकरण ९ : वसाहत शासनकालीन भारतीय अर्थव्यवस्था | ४२ |
| ९. | प्रकरण १० : समाजसुधारकांद्वारे स्त्री सुधारणांबाबत प्रयत्न | ४८ |
| १०. | प्रकरण ११ : १८५७ चा पुर्व उठाव आणि १८५७ चा उठाव | ५९ |
| ११. | प्रकरण १२ : क्रांतीकारक चळवळ | ६५ |
| १२. | प्रकरण १३ : शेतकरी आंदोलने | ७४ |
| १३. | प्रकरण १४ : मुस्लिम इतिहास | ८५ |
| १४. | प्रकरण १५ : ब्राम्हणेत्तर चळवळ | ९४ |
| १५. | प्रकरण १६ : राष्ट्रीय चळवळ १८८५ ते १९४७ | ९८ |
| १६. | प्रकरण १७ : राष्ट्रीय चळवळ १९१५ ते १९४७ | १०२ |
| १७. | प्रकरण १८ : समाजसुधारक व व्यक्तीविशेष | १०४ |
| १८. | **PREDICTIONS** | ११६ |

# प्रकरण 1 : ब्रिटिश सत्तेची भारतात स्थापना

## पोर्तुगीज

- पोर्तुगीज राजकुमार **हेन्री द निविगेटर** याने दिशा सुचक यंत्र आणि नक्षत्र यंत्र या यंत्राचा विकास केला. त्यामुळे समुद्री यात्रा सोपी झाली होती.
- **प्रिन्स :** हेन्री यांनी भारतातील सागरी मोहिमांना प्रोत्साहन दिले.
- **कोलंबस :** द संता मारिया, द निना, द पिंटा ही तीन जहाजे घेऊन भारताच्या शोधात निघाला. पण पोहचला नाही.
- **बार्थोल्यु दायस :** 1487 मध्ये हा पोर्तुगीज भारताच्या शोधात निघाला पण तो 'केप हॉप गुडहोप' पर्यंत पोहचला. (आशियाचे भुशिर)

## पहिली सागरी सफर (वास्को-द-गामा)

- 1498 - राणी ईसाबेला हिने दिलेल्या सहकार्यामुळे 'वास्को-द'गामा' हा पोर्तुगीज खलाशी 'केप हॉप गुडहोपला' वळसा घालुन भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालीकत येथे पोहचले.
- कालीकत बंदरात 'कपट' या गावात आले. (20 मे 1498)
- केप ऑफ गुड होप पर्यंतचा मार्ग **बार्थोल्यु** डायसने दाखवला.
- केप ऑफ गुड होप ते भारत पर्यंतचा मार्ग हा गुजराती व्यापारी **'अब्दुल माजिद'** याने दाखवला. (केप हॉप गुड होप पासुन 21 दिवसात तो भारतात आला.)
- वास्को द गामा पश्चिम किनाऱ्यावर आला तेव्हा तेथे 'झामोरिन्स' राजा राज्य करत होते; ज्यांनी त्यांचे स्वागत केले.
- झामोरिन्स (हिंदु राजा) कडुन व्यापाराच्या सवलती मिळवुन ते 1499 ला माघारी गेले.

## दुसरी सागरी मोहीम (1500)

- दुसरी सागरी मोहीम **पेड्रो अल्वारेस केब्रेल** याने केली. (याने ब्राझीलचा शोध लावला.)
- त्याने भारतात पहिली पोर्तुगीज फॅक्टरी कालीकत येथे सप्टेंबर 1500 मध्ये स्थापन केली.
- अरबी व्यापाऱ्यां विरुध्द त्यांनी भारतात लढाई केली व ते मायदेशी परतले.

## तिसरी सागरी मोहीम (1502)

- पुन्हा **वास्को द गामा** भारतात आले व त्यांनी भारतात कन्नोर येथे वसाहती स्थापन केली व कालांतराने **कालीकत, कन्नोर व कोचीन** हे पोर्तुगीजांचे प्रमुख व्यापारी केंद्र बनले.
- कोचीन आणि कन्नोर वखारीची क्षमता वाढवुन व सैन्याची तुकडी मागे ठेवुन ते परत गेले.
- इ.स. 1503 मध्ये **लोपो सोरस** भारतात आले व त्यांनी अरबांची बंदरे जाळुन टाकली.

## फ्रांसिस्को-डी-अल्मेडा-पहिले पोर्तुगीज गव्हर्नर (1505-1509)

- 1505 मध्ये भारतातील पोर्तुगीज राज्याचे पहिले गव्हर्नर आणि व्हाईसरॉय म्हणून नियुक्ती करण्यात आली (एस्टाडो दा इंडिया). 1509 मध्ये दीवच्या नौदल युद्धात विजय मिळवून हिंद महासागरात पोर्तुगीजांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचे श्रेय अल्मेडा यांना जाते.
- अल्मेडाने हिंदुस्थानात आल्यावर स्वतला **व्हॉईसरॉय** ही पदवी दिली.
- हिंदी महासागरावर नियंत्रण ठेवण्यावर केंद्रीत असलेले त्यांचे धोरण **'ब्ल्यु वॉटर पॉलिसी' (कार्टझ सिस्टम)** म्हणून ओळखले जाते.
- या मध्ये 'कार्टझ सिस्टम' (हा नौदल व्यापार परवाना किंवा पास होता जो पोर्तुगीज साम्राज्याने सोळाव्या शतकात हिंद महासागरात जारी केला होता.

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

- अल्मेडा च्या काळामध्ये दोन प्रमुख लढाया झाल्या त्यातील चौलाची लढाई 1507 मधे मुस्लीम व्यापारी जहाजांनी अल्मोडा चा पराभव केला ज्यामध्ये अल्मेडा चा मुलगा मृत्युमुखी पडला.
- त्यानंतर 1508 मधे दीव येथे झालेल्या लढाई मध्ये अल्मेडाने पुन्हा मुसलमानांचा पराभव करत पोर्तुगीज श्रेष्ठत्व सिद्ध केले.
- अल्मेडाने युरोपला हत्ती पाठवला. भारतातुन युरोपला जाणारा तो पहीला हत्ती होता.
- अल्मेडा पोर्तुगालला परत जाण्यापुर्वी 1510 मध्ये केप ऑफ गुड होप येथे स्थानिक लोकांशी झालेल्या संघर्षात त्यांचा मृत्यू झाला.

## अल्फान्सो-डी-अल्बुकर्क-दुसरे पोर्तुगीज गव्हर्नर (1509)

- अल्बुकर्कने पोर्तुगीज आशियाई साम्राज्याची स्थापना करून इस्लामचा मुकाबला करणे, ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे आणि मसाल्यांचा व्यापार सुरक्षित करणे या तीन योजना आखत भारतामध्ये प्रवेश केला.
- **पोर्तुगीज सत्तेचा भारतातील खरा संस्थापक** असे अल्बुकर्कला म्हटले जाते.
- **सती प्रथा नष्ट करण्याचा** त्यांनी प्रयत्न केला.
- 1510 मध्ये **आदिलशहाकडून त्याने गोवा जिंकला** ही त्याची सगळयात महत्त्वाची कामगिरी होती.
- कनिष्ठ पोर्तुगीजांनी भारतीय महीलांशी विवाह करणे तसेच धर्म प्रसारा बाबतीतही अल्बुकर्क ने भूमिका घेतलेली होती.
- विजयनगर साम्राज्य सोबत त्याचे सलोख्याचे संबंध होते.

## निनो-द-कुन्हा (1529-38)

- नोव्हेंबर 1529 मध्ये राजधानी कोचीनवरुन गोव्याला हलवली.
- 1534 मध्ये बहादूरशहाकडून दीव, साष्टी, वसई जिंकून घेतले.
- यांनी सेंटथोमे (मद्रास), हुगळी व दीव येथे वसाहती स्थापन केल्या.
- **निनोने जिंकलेली इतर ठिकाणे :** दमण, ठाणे, तारापुर, माहिम, मुंबई इ.

| **1739 वसईचा तह (मराठ्यांनी हरवले)** |
|---|
| चिमाजी अप्पाने पोर्तुगीजाकडून 1739 मध्ये **सालसेट व बेसिनचा** (वसई) किल्ला घेतला होता. |

- भारतात सर्वात जास्त 451 वर्षे पोर्तुगीजांनी राज्य केले.
- पोर्तुगीजांनी भारताला दिलेल्या वस्तु - तंबाखुची शेती, जहाज निर्माण (गुजरात), प्रिंटींग प्रेस (गोवा)

रयत प्रबोधिनी सर्वसाठी ज्ञानार्जन

## मार्टीन अल्फन्सो डिसूझा (1542-1545)

- यांच्या कालावधीत प्रसिद्ध जेस्यूट **सेंट फान्सिंस झेवियर** भारतात आला.

## पोर्तुगीजांच्या वसाहती

- पॉडेचेरीवर सत्ता स्थापन करणारा पहिला युरोपियन देश पोर्तुगाल होता.
- पूर्व किनारपट्टी - मद्रास, नागपट्टनम, हुगळी, चितगाव, सॅरीथोम, कासिम बजार
- 1650 'कासिम बजार' या वसाहतीच्या ठिकाणी रेशिम उद्योग निर्मिती केली गेली.
- पश्चिम किनारपट्टी- कोचीन, कालिकत, कन्नोर, गोवा, दीव, दमन, मुंबई, वसई/बेसा

## डच (हॉलंड)

- मुळ निवासी - **हॉलंड**

- 1602 मध्ये डचांनी हॉलंड मध्ये उपस्थित इतर कंपन्यांना एकत्रित करुन **द ईस्ट इंडिया कंपनी ऑफ नेदरलँड्स** स्थापन केली.
- पहिल नागरीक - **कार्नेलिया हटमन** हा पहिला डच नागरीक जो केप ऑफ गुड होप मार्गी भारतात आला.
- डचांचे पहिले व्यापारी अभियान कार्नेलिया हटमन या अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली निघाले होते.
- **पहिल गव्हर्नर - पीटर बोथ**
- पहिली वसाहत - **मच्छलीपट्टनम (1605) - वॉटर हेग**
- डच संसदेने (स्टेट्स जनरलने / डच पार्लमेंटने) या कंपनीला एक सनद 21 वर्षांसाठी बहाल केली. त्यानुसार कंपनीला युद्ध करणे, तह करणे, प्रदेश काबीज करणे, किल्ले बांधणे असे अधिकार मिळाले.

## डचांच्या वसाहती

- पूर्व किनारा - नागापट्टनम, कारिकल, पुलिकत, मच्छलीपट्टनम, बिम्लीपट्टनम, बालासोर, चिन्सुरा, हुगळी, पटणा, आग्रा
- पश्चिम किनारा-कोचीन, सुरत.
- डचांचे 1690 च्या आगोदर पुलीकत हे व्यापारी केंद्र होते परंतु नंतर नागापट्टनम हे त्यांचे व्यापारी केंद्र बनले.

## डचांची वाटचाल

- डचानी आपले लक्ष आग्नेय आशियात केंद्रीत केले होते. (मलेशिया, जावा, सुमात्रा, इंडोनेशिया)
- या बेटावरुन पोर्तुगीजांची हकालपट्टी केली.
- मसाल्याचा व्यापार या प्रदेशात केला.
- 1623 मध्ये इंग्रजांचा आग्नेय आशियात पराभव केला.
- 1658 पोर्तुगीजाकडून श्रीलंका जिंकून घेतले.
- इंग्रज व डच यांच्या स्पर्धेत ब्रिटीशांनी 1759 मध्ये बंगालमध्ये बेदरा येथे डचांचा पराभव केला.

## डचांचे योगदान

- मसाल्याचे पदार्थ, कापड, नीळ, रेशीम, अफू, नगदी पिके, इत्यादीचा व्यापार केला.
- डच हे भारताशी **मुक्त व्यापार करणारे पहिले युरोपियन** होते.
- पश्चिम आशियाई देशातही त्यांनी आपले वर्चस्व निर्माण केले होते.
- डचांनी पुलीकतमध्ये **'पगोडा'** नावाचे **सुवर्ण सिक्के** तयार केले.
- 1795 मध्ये डचांनी भारत सोडला व **भारतातून बाहेर जाणारे पहिले युरोपियन** डच होते.

## ब्रिटिश (इंग्रज)

- 1599 - **जॉन मिल्डेन** पायी चालत चालत आलेला पहिला इंग्रज
- **'लॉर्ड मेयर'** यांनी पुर्वेकडील देशांसोबत व्यापार करण्याच्या योजनेमधुन कंपनीची स्थापना केली. (डचांच्या व्यापाराला शह देण्यासाठी)
- **कंपनीचे नाव – The Government & the Company of Merchants of London Trading into East Indias – 1599.**
- **रॉयल चार्टर – 31 डिसेंबर 1600 या दिवशी EIC ला राणी एलिझाबेथ-1 हिने 15 वर्षांची सनद दिली. यावेळी कंपनीची एकुण 215 सभासद होते. अर्ल ऑफ कंबरलॅंड हे कंपनीचे अध्यक्ष होते.**
- आमच्या देशाच्या व्यापार वाढुन आमच्या देशाची भरभराट व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय संस्था स्थापन करण्यात येत आहे. असे इस्ट इंडियाच्या सणदेत म्हटले होते.

- 1608 - कॅप्टन विल्यम हॉकिंग्ज याच्या नेतृत्वा खालील तिसरी मोहिमेत इंग्रज भारतात आले व **सुरत** येथे पहिली वखार स्थापन केली. **संचालक - थॉमस आल्डवर्थ**
  1. आचिंग (सुमात्रा) - बांग्टम (जावा) पहिली सागरी मोहीम
  2. मलाक्का - दुसरी सागरी मोहीम
  3. भारत - तिसरी सागरी मोहीम
- हॉकींगला तुर्की भाषा येत असल्याने जहांगीरच्या दरबारात यशस्वी संवाद करु शकला.
- 1612 - **स्वालीहोलच्या लढाईत** इंग्रजांनी कॅप्टन बेस्टच्या नेतृत्वात पोर्तुगीजांचा पराभव केला. या लढाईमुळे जहांगीर याने इंग्रजांची बाजु घेत 1613 मध्ये सुरत या ठिकाणी स्थायी कारखाना काढण्यासाठी परवानगी दिली.
- 1615 - 1618 थॉमस रो याने जहांगीर यांच्या कडुन व्यापारी फर्मान मिळवले. या फर्मानामध्ये अंतर्गत कोणताही कर न भरता व्यापार करण्यासाठी परवानगी दिली त्यामुळे ब्रिटीश आणि मोगल यांच्यात व्यापारी करणाचा संबंधाचा पाया घातला गेला.
- सुरत, खंभात इ. ठिकाणी साडेतीन टक्के जकात देण्याचे कबुल करुन जहांगीर बादशहाने वखारी घालण्यास परवानगी दिली.
- थॉमस रो ने 10 जानेवारी 1616 रोजी दरबारी भेट दिली.
- इंग्लंडला पाठवलेला वार्षिक अहवालात थॉमस रो नंतर कायमचा तह होणे शक्य नाही वेळ पडेल तसे आपण वागले पाहिजे जरुर तेवढी फर्माणे मिळाली आहेत व काही मिळवायची आहेत. बादशहाची मर्जी हाच येथे कायदा असुन पैशावर सर्व व्यवहार चालतात.

## पश्चिम किनाऱ्यावरील सत्ताप्रवेश

### जॉर्ज ऑक्सडेन

- 1662 मधे अब्राहम शिपमॅन यांची मुंबईचा पहिला रॉयल गव्हर्नर म्हणुन नेमणुक झाली होती. (रॉयल म्हणजे राजघराणातील कारण मुंबई पोर्तुगीज राजपुत्री  कॅथरीन आणि चार्लसच्या लग्नात मधे इंग्रजांना मिळाली जी नंतर कंपनीला भाडेतत्वावर दिली गेली)
- 1668 च्या सुमारास राजा चार्लस ने मुंबई बेट ईस्ट इंडीया कंपनीला भाड्याने दिल्यानंतर जॉर्ज ऑक्सडेन यांची कंपनीचा गव्हर्नर म्हणुन नेमणुक करण्यात आली.
- याच काळात सुरत वरुन कंपनीचे केंद्र मुंबईकडे आणण्यात आले.
- या जॉर्ज ऑक्सडेन याला सुरत लढाई दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांचा सामना करावा लागला होता हे विशेष..

### 'जेराल्ड ऑजियर (1669 ते 1677)

- ऑक्सडेन या पाहिल्या ईस्ट इंडीया कंपनीच्या गव्हर्नरच्या मृत्यूनंतर जेराल्ड यांची वर्णी गव्हर्नर पदी लागली होती.
- भंडारी मिलट्रीया (भंडारी दल) हे शहर सुरक्षेसाठीचे दल त्यांनी उभे केले होते.
- मुंबई मधे कर निर्धारण, जबाबदार कायदे व्यवस्था आणि व्यवसायासाठी नियमावली यांनी लागु केली.
- निमा पारेख नावाच्या व्यापाराला मुंबई मधे येवुन व्यापार करण्यासाठी त्याला आणि त्याच्या समुदायाला  सुरक्षापत्र देखील देवू केले.
- कोलाबा आणि OLD WOMEN ISLAND ही बेटे त्यांनी मिळवुन मुंबईला जोडली.
- रुपयाची नाणी तयार करणाऱ्या टांकसाळी देखील त्यांनी तयार केल्या.
- त्यांच्या 8 वर्षाच्या काळात त्यांच्या आर्थिक धोरणामुळे मुंबई शहर घौडदौड करु लागले आणि लोकसंख्या 10,000 वरुन 80,000 वर पोहचली.
- यामध्ये मुंबई मध्ये व्यवसायासाठी झालेले स्थालांतर हे प्रमुख कारण होते.

- पंचायतीच्या स्थापनेच्या माध्यमातुन वेगवेगळया जात समुहातील गरीब आणि श्रीमंत मंडळींना एकत्र ठेवुन व्यापार वाढ आणि त्यांचे वर्तन याची ही निश्चिती त्यांनी केली.
- मुंबईचा शिल्पकार असा उल्लेख केलेला हा माणुस मुंबई शहराचा निर्माताच आहे.
- 1674 मधे झालेल्या शिवराज्याभिषेक सोहळयासाठी उपस्थित असणारे 'टोपीकर इंग्रज 'हे जेराल्ड साहेबांचेच प्रतिनिधी होते.

## पुर्व किणाऱ्यावरुन इंग्रज (सत्ताप्रवेश) (कोरोमंडल)

- सन 1611 मध्ये रो ने मच्छलीपट्टनम येथे वसाहत स्थापन केली.
- थॉमस रो चा 1611 मध्ये पुलिकत काबीज करण्याचा प्रयत्न असफल ठरला मात्र उत्तरेस कॅ. **हिपोनने पेट्टपुळी** येथे वखार स्थापन केली.
- 1630 - थॉमस रो याने गोवाळकोंडाच्या सुलतानाकडुन गोल्डन फर्मान मिळवले व 500 पैगोडा मध्ये पुर्व किनारा मिळवला. व व्यापार सुरक्षीतता मिळवली.
- पुर्व किनाऱ्यावरुन हिरे, मोती आणि कापड याचा व्यापार केला.
- Francis de याने मद्रासच्या वखारी साठी चंद्रगिरीच्या राजाकडुन वखारीसाठी परवानगी मिळवत 'फोर्ट सेंट जॉर्ज' च्या उभारणीला सुरुवात केली.
- 1641 - मध्ये मद्रासची वखार म्हणजेच **फोर्ट सेंट जॉर्ज** मसुलीपट्टणमच्या ऐवजी प्रमुख केंद्र बनली. व ईस्ट इंडिया कंपनीच्या पुर्वेकडील सर्व वखारी या वेळीपासुन फोर्ट सेंट जॉर्ज च्या नियंत्रणात आणल्या गेल्या.1653 मध्ये मद्रास प्रेसिडेन्सी नावाने ही वसाहत स्वतंत्र झाली.

## बंगालमधील इंग्रजांचा सत्ताप्रवेश

- 1633 मध्ये कार्टराईटने - ओरिसात प्रवेश केला.
- ओरीसाच्या गव्हर्नर कडुन हरिहरपुर (महानदीच्या मुखाजवळ) बालासोर, पिपली या ठिकाणी वखारी स्थापन केल्या.
- 1651 ला शहाशुजा याच्याकडुन गेब्रीयन बाऊटन याने व्यापाराची परवानगी मिळवुन व्यापाराला हुगळी या ठिकाणी प्राथमिक सुरवात केली. नंतर पाटना ढाका, कासिम बाजार, हुगळी या ठिकाणी ब्रिटीशांच्या वखारी स्थापन केल्या.
- 1657 मध्ये वखारीची नवी व्यवस्था क्रोमवेलने आणली. [कारकुण (रायटर) → दुकाणदार (फॅक्टर) → व्यापारी (मर्चंट)]
- 1667 - मध्ये औरंगजेबाने इंग्रजांना व्यापाराचे फर्मान दिले.
- 1672 - शाहिस्तेखान याने ते फर्मान पुढे कायम केले.
- 1672- जॉब चारनॉक याने सुतानती या ठिकाणी इंग्रजांची अद्यावत वसाहत स्थापन केली.
- 1676 - च्या सनदेने कंपनीला मुंबई येथे नाणी पाडणे हा महत्वपुर्ण अधिकार दिला.
- 1683 - च्या सनदेने कंपनीला भारतातील दुसऱ्या कोणत्याही सत्तेशी युध्द किंवा तह करण्याचा अधिकार दिला.
- बंगाल (1696) - अफघाणी बंडखोर रहमत खान याने बंड केले. या बंडाविरुध मोगल बादशाने ब्रिटीश, डच यांच्याकडुन संरक्षण मागितले.
- 1696 - वर्धमान जिल्ह्यातील जमीणदार शोभा सिंह याने ब्रिटिशांविरुध्द बंडाचा झेंडा उभारला. त्याचाच परिणाम म्हणुन 1696 मध्ये ब्रिटिशांनी सुतानती वखारीचे मजबुतीकरण सुरु केले.
- अझीमन शहा या बंगालच्या गव्हर्नर ने परवानगी दिल्यामुळे ब्रिटिशांनी सुतानती, कालीकत गोविंदपुरा या गावांची जमिनदारी अवघ्या 1200 रुपयात मिळवली.

**नारिश मिशन (1698)**

- हे औरंगजेबाच्या दरबारात 'विल्यम नारिश' यांच्या नेतृत्वात व्यापारी सुविधा प्राप्त करण्यासाठी आलेले मिशन होते.

रयत प्रबोधिनी
गोरगरिबांसाठी ज्ञानार्जन

- 1700 - या वर्षी ब्रिटिशांनी बंगालला स्वतंत्र प्रेसीडेंसीचा दर्जा देत मद्रास आणि बंगालचा कारभार स्वतंत्र केला. आणि फोर्ट विल्यम बांधला. या प्रेसीडेंसी प्रमुख पदी - **चार्ल्स एर** यांची नियुक्ती झाली.
- 1707 - औरंगजेबाच्या मृत्यु नंतर ब्रिटिशांची कलकत्ता मधील आपल्या व्यापाराविषयी अनिश्चितता वाढत गेली. परंतु नवीन सुलतान शाह आलम आणि मुर्शीद कुली खान (बंगालचा नबाब) यांच्याशी करार करत स्थैर्य प्रस्थापित केले.

## सुरमॅन मिशन

- डॉ. हॅमिल्टन याने बादशहा फारुक सियर यांची एका रोगापासुन मुक्तता केली. त्यामुळे 1717 एक शाही फर्मान जारी केले ज्यामुळे कंपनीला विशेषाधिकार प्राप्त झाले.
- 3000 रु. वार्षिक कराच्या बदल्यात कंपनीला बंगालमध्ये मुक्त व्यापार करण्याची मुभा मिळाली.
- 10000 रु. वार्षिक कर देण्याच्या बदल्यात कंपनीला सुरतमध्ये सर्व करापासुन मुक्ती मिळाली.
- मुंबईत कंपनीकडुन घडवण्यात आलेल्या नाण्यांचे प्रचलन संपुर्ण मुघल साम्राज्यात करण्याची आज्ञा मिळाली.
- ब्रिटीश इतिहासकार और्म याने याला **'कंपनीचा मॅग्नाकार्टा'** असे म्हटले.

- 1717 - 'फारुख सियार' यांच्या दरबारात जॉन-सुरमॅन व डॉ. हॅमेल्टन दरबारात एका शिष्टमंडळा सोबत गेले. ही शिष्ठाई यशस्वी ठरली आणि कंपनी साठीची महत्वाची असणारी तीन फर्माने बंगाल, हैद्राबाद आणि गुजरात च्या संदर्भात कंपनीला मिळाली. भारताच्या इतिहासात ही फर्माने अत्यंत महत्वाची समजली जातात.

## डेन

- इंग्रजानंतर डेन 1616 ला भारतात आले तंजोर जिल्ह्यातील त्रंकोबार (तामिळनाडू) येथे 1620 ला पहिली फॅक्टरी सुरु केली.
- 1676 - सेरामपुर हे त्यांचे मुख्य केंद्र होते.
- 1854 - सर्व कंपनी ब्रिटीश कंपनीला विकली आणि भारतातुन निघुन गेले.
- स्वीडीश ईस्ट इंडियाची स्थापना - 1731 - मध्ये झाली.
- त्यांनी आपला व्यापार चीनसोबत कायम केला.

## फ्रेंच

- 1664 कोलबर्ट याच्या पुढाकारातून FEIC ची स्थापना झाली.
- FEIC मुख्य उद्देश मादागास्कर बेटावर वसाहत निर्माण करणे व भारताशी व्यापार करणे हा होता.
- पहिली वसाहत सुरत (1668) - फ्रॅकॉईस केरॉन
- दुसरी वसाहत - मछलीपट्टनम (1669)- माराकारा (गोळकोंड्याच्या सुलतानची परवानगीने)
- पहिला गव्हर्नर - फ्रान्सीस मार्टीन.
- 1673 - मसुली पट्टणमचा प्रमुख फ्रान्सीस मार्टीन याने शेर खान लोदी यांच्याकडुन वखारीसाठी जागा मिळवली. जी नंतर पॉंडेचेरी म्हणुन विकसित केली. व तिचा पहिला गव्हर्नर फ्रान्सीस मार्टीन होता.
- 1690 - मध्ये फ्रेंचांनी बंगाल मधील प्रसिध्द वसाहत असणाऱ्या चंद्रनगरचा पाया घातला. ज्यासाठी त्यांना शाहिस्तेखानाने परवानगी दिली होती.
- 1724 - डुप्ले या फ्रेंच गव्हर्नर च्या आगमनानंतर ब्रिटिश-फ्रेंच संघर्ष वाढत गेला व 1760 मध्ये वॉंदीवॉश लढाईत फ्रेंचांचा पुर्ण पराभव झाला.
- फ्रेंचानी पॉंडेचेरी येथे आपली सत्ता 26 डिसेंबर 1816 रोजी स्थापित केली. जी 1 नोव्हेंबर 1954 पर्यंत चालली.

रयत प्रबोधिनी लोकसेवेसाठी ज्ञानार्जन

## फ्रेंचाच्या वसाहती

- पूर्व किनारा - कारिकल - T.N. (पाँडेचेरी), यानम A.P. (पाँडेचेरी), सेंट थोमे, मच्छलीपट्टनम
- पश्चिम किनारा सुरत, माहे - केरळ

- **अपयशाची कारणे :**

➢ फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनी पुर्णतः फ्रेंच सरकारवर अवलंबून होती. ती खाजगी कंपनी नव्हती.

➢ भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, अस्थैर्य ही फ्रेंचाच्या राजेशाहीचे वैशिष्ट्ये होती.

➢ अपुरे मनुष्यबळ व सागरी सामर्थ्य इंग्रजापेक्षा कमी होते.

NOTES

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

# प्रकरण - 2 ब्रिटिश कालीन कायदे

## भारतीय कौन्सिल कायदा 1909

- 1907 - सर अरुण्डेल समितीच्या शिफारशी नुसार हा कायदा तयार करण्यात आला.
- याच कायद्याला 'मोर्ले-मिंटो' सुधारणा कायदा असे देखील म्हणतात. यातील 'लॉर्ड मोर्ले' हा भारतमंत्री तर 'लॉर्ड मिंटो' हा व्हाईसरॉय होता.
- व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात व्हाईसरॉय आणि 7 सर्वसाधारण सदस्य आणि 1 असाधारण सदस्य होते.
- या कायद्याने केंद्रीय तसेच प्रांतिक कायदेमंडळाचा विस्तार केला.
- केंद्रीय कार्यकारी मंडळातील सदस्य (9 कार्यकारी सदस्य वगळता) संख्या 16 वरुन 60 केली. त्यातील 28 नामनिर्दिशत तर 32 गैरसरकारी सदस्य असतील. अशा रीतीने, केंद्रीय कायदेमंडळाची महत्तम सदस्यसंख्या 69 असेल. त्यांपैकी 37 सरकारी व 32 गैर-सरकारी असतील.
- **प्रांतिक विधीमंडळातील सदस्य संख्या एकसारखी नव्हती. ती पुढीलप्रमाणे -**
  बंगाल - 52
  बॉम्बे, मद्रास, संयुक्त प्रांत - 47
  पुर्व बंगाल व आसाम - 41
  पंजाब - 25
  बर्मा - 16
- या कायद्याने प्रथमच भारतीयांना व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात सदस्य म्हणुन घेण्यात आले. **(पहिले भारतीय - 'सतेंद्रनाथ सिन्हा'** त्यांची नियुक्ती कायदा सदस्य म्हणुन झाली. 1909) या पुर्व 1907 ला भारत मंत्र्यांच्या कार्यकारी मंडळात 2 भारतीयांची नेमणुक झाली होती.

1. के.जी. गुप्ता
2. सय्यद हुसेन बिलग्रामी


- या कायद्याने स्वतंत्र मतदारसंघ संकल्पना मान्य करुन 'मुस्लिमांना' धर्मावर आधारित प्रतिनिधीत्व दिले. या नुसार मुस्लीम सदस्य फक्त मुस्लीम मतदार निवडणार होते. (6 जागा)
- याच कायद्याने नगर मंडळे, व्यापारी संघटना, विद्यापीठे, जमीनदार यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व दिले गेले.
- स्वतंत्र मतदारसंघ निर्माण केल्याने 'लॉर्ड मिंटो' याला 'स्वतंत्र मतदारसंघाचे जनक' म्हणतात.
- या कायद्याने प्रथमच पुर्णतः निवडणूकीचे तत्व मान्य केले. या कायद्यानुसार पहिल्यांदा निवडणूक आयोगाची संकल्पना उदयास आली.

- **या कायद्यावर झालेल्या वेगवेगळ्या टिका :**

1. **महात्मा गांधी -** ''मोर्ले-मिंटो सुधारणा आपल्या नाशाचे कारण ठरले आहे.''
2. **के.एम.मुन्शी -** या सुधारणांनी ''उदयोन्मुख लोकशाहीला भोसकले आहे.''
3. **जवाहरलाल नेहरु -** स्वतंत्र मतदारसंघांमुळे ''मुस्लीमांच्या सभोवती राजकीय अडथळा निर्माण झाला, ज्यामुळे ते उर्वरित भारतापासून वेगळे पडले, आणि शेकडो वर्षांपासून चालु असलेल्या एकात्मिकरणाच्या प्रक्रियेला खीळ बसली. हा अडथळा मर्यादीत मताधिकारामुळे सुरुवातीला छोटा होता, मात्र मताधिकाराच्या प्रत्येक विस्ताराबरोबर तो वाढत गेला व त्याने संपूर्ण राजकीय व सामाजिक जीवनाच्या संरचनेला प्रभावित केले.''
4. **लॉर्ड मोर्ले -** लॉर्ड मिंटोला लिहिलेल्या पत्रात त्याने योग्यच म्हटले की, स्वतंत्र मतदारसंघ देऊन ''आपण ड्रॅगनचे दात पेरत आहोत आणि त्याचा हंगाम निश्चितच कटू असेल.''

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

**या कायद्यानुसार प्रथमच सार्वजनिक हिताच्या कोणत्याही प्रश्नावर प्रस्ताव सादर करण्याचा अधिकार देण्यात आला. यालाच अधिन राहुन पहिला प्रस्ताव 25 फेब्रुवारी 1910 ला गोपालकृष्ण गोखले यांनी सादर केला.**





## भारतीय सरकार कायदा 1919

- यालाच 'मॉटेग्यु - चेम्सफोर्ड' कायदा असे देखील म्हणतात.
- मॉटेयु हा भारतमंत्री तर चेम्सफोर्ड हा व्हाईसरॉय होता.
- 20 ऑगस्ट 1917 ला ब्रिटीश सरकारने घोषणा केली की, भारतात टप्प्याटप्प्याने जबाबदार सरकार स्थापन केले जाईल याच हेतुने 1919 ला हा कायदा पारित केला. 1921 ला हा कायदा अंमलात आला.
- 1793 पासुन भारत सचिवाला वेतन भारताच्या तिजोरीतुन मिळत होते ते आता बंद होऊन ब्रिटीश तिजोरीतुन दिले जाईल.
- उच्चायुक्त (High Commissioner) नावाने नविन पद तयार करुन त्याकडे भारतमंत्र्यांची काही कामे सोपवली आणि त्याचा पगार भारताकडुन होता. **(पहिले उच्चायुक्त - विल्यम मेयर)**
- केंद्रीय आणि प्रांतिक विषय वेगळे करुन केंद्राचे प्रांतावरील नियंत्रण कमी करण्यात आले. प्रांतिक विषयांचे 'सोपीव' आणि राखीव' असे दोन गट करण्यात आले.

1. **सोपीव** - या विषयाचे प्रशासन गव्हर्नर मार्फत मंत्र्यांच्या सहाय्याने केले जाईल.
2. **राखीव** - या विषयाचे प्रशासन गव्हर्नर मार्फत कार्यकारी मंडळातील सदस्य पाहतील. याच दुहेरी शासन पध्दतीला द्विदल राज्यपध्दती (Dyarchy) असे म्हणतात. (8 प्रांतात)

| क्र. | राज्य | क्र. | राज्य | क्र. | राज्य | क्र. | राज्य |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | बंगाल | 2. | बॉम्बे | 3. | मद्रास | 4. | बिहार |
| 5. | मध्य प्रांत | 6. | पंजाब | 7. | आसाम | 8. | संयुक्त प्रांत |

- या कायद्यानुसार केंद्रात प्रथमच एकसदनी कायदेमंडळाच्या ऐवजी 'द्विसदनी कायदे मंडळ' निर्माण केले.
- यानुसार राज्यसभेचा कार्यकाळ 5 वर्षे तर केंद्रीय कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ 3 वर्षे होता.




- थोडक्यात एवढेच की 1919 च्या कायद्याने केंद्रात द्विसदनी कायदेमंडळ तर प्रांतात द्विदलीय राज्यपध्दती निर्माण केली.
- व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात असलेल्या 8 सदस्यांपैकी 3 सदस्य भारतीय असतील अशी तरतुद केली.
- शीख, भारतीय ख्रिश्चन, ॲंग्लो इंडियन, युरोपीयन स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले.
- या कायद्याने केंद्रीय अर्थसंकल्पातुन प्रांतांचे अर्थसंकल्प वेगळे करण्यात आले.
- या कायद्यात 'लोकसेवा आयोग' निर्माण करण्याची तरतुद होती. त्यानुसार ली कमिशन च्या शिफारशीने 1926 ला केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली.
- या कायद्यात अशी बाब नमुद होती की, या कायद्याचा अंमल झाल्यावर त्याची अंमलबजावणी कशी होते, हे तपसण्यासाठी 10 वर्षांनी एक आयोग स्थापन करावा.
- 4 जुलै, 1918 ला मॉटफोर्ड अहवाल प्रकाशित झाल्यानंतर टिळकांनी तीन अग्रलेख लिहिले.
  1) 'उजाडले पण सूर्य कोठे आहे'
  2) 'जनाब देहली तो बहोत दूर है'
  3) आणि 'कबूल वा नाकबूल'

- भारत सरकार कायदा 1919 मध्ये उद्देशिका, 47 कलमे व 2 परिशिष्ट्ये होती.
- 1919 च्या कायद्यानुसार सर्वप्रथम 1920 मध्ये निवडणूका झाल्या आणि पहिल्या केंद्रीय कायदे मंडळाची निर्मिती 9 फेब्रुवारी 1919 ला झाली. या नंतर 1923, 1926, 1930, 1934, 1945 अशी एकुण 6 वेळा केंद्रीय कायदे मंडळाची निर्मिती झाली.
- 9 फेब्रुवारी 1921 रोजी भरलेल्या केंद्रीय कायदे मंडळाच्या अध्यक्षेपदी सर फ्रेडरिक व्हाइट तर उपाध्यक्ष पदी सच्चिदानंद सिन्हा यांची निवड झाली.
- केंद्रीय कायदे मंडळाचे पहिले भारतीय अध्यक्ष म्हणून विठ्ठल भाई पटेल (1925) यांची निवड झाली.
- राज्यसभेचे पहिले अध्यक्ष म्हणून अलेक्झांडर मुडीमैन यांची निवड झाली होती.
- 1 एप्रिल 1921 ला प्रांतासाठी सुरु झालेली द्विदलीय राज्य पध्दती 1 एप्रिल 1937 पर्यंत लागू होती.

- त्यामुळे ब्रिटिश संसदेने दुसरी समिती नेमली व त्या समितीने कंपनीला 14 लक्ष कर्ज हे 4 टक्के व्याजदराने मंजुर केले व कंपनीसाठी नियामक कायद्याची तरतुद केली.

## भारत शासन कायदा 1935

- या कायद्यात एकुण 14 भाग, 321 कलमे आणि 10 परिशिष्टे होती.

**कायद्यामधील बाबींचे प्रमुख स्त्रोत :**


1. सायमन अहवाल
2. नेहरु अहवाल
3. तिन्ही गोलमेज चर्चा
4. ब्रिटीश सरकारची श्वेतपत्रिका
5. लोथियन समिती अहवाल

- या कायद्यात प्रांत व संस्थाने मिळून अखिल भारतीय संघराज्य स्थापन करण्याची तरतूद होती.
- या कायद्याने प्रांतांमधील 'द्विदलीय राज्य पध्दती बंद केली. त्याऐवजी प्रांतिक स्वायत्तता दिली. आणि सर्व खाती लोकप्रतिनिधीकडे दिले. 1937 ला ही पध्दत लागु झाली आणि 1939 ला बंद झाली.
- या कायद्याने केंद्रात द्विदलीय शासनपध्दती सुरु झाली. केंद्रातील विषयांची राखीव आणि सोपीव अशी विभागणी केली. ही पध्दत प्रत्यक्षात आली नाही.
- या कायद्यान्वये मताधिकार वाढवून एकूण लोकसंख्येच्या 10 टक्के लोकांना मताधिकार मिळाला.
- 11 पैकी 6 प्रांतात द्विसदनी कायदेमंडळाची तरतुद करण्यात आली.
- **6 प्रांत पुढीलप्रमाणे :**


| | | |
|---|---|---|
| 1) बंगाल - 250 | 2) बॉम्बे - 175 | 3) मद्रास - 215 |
| 4) बिहार - 152 | 5) आसाम - 108 | 6) संयुक्त प्रांत - 228 |

- **संघराज्य कायदे मंडळ द्विगृही असेल अशी तरतूद करण्यात आली.**

1. **राज्यसभा (Council of States)** : हे स्थाही सभागृह असेल व दर 3 वर्षांनी त्याचे 1/3 सदस्य निवृत्त होतील. राज्यसभेत ब्रिटिश प्रांतांनी निवडून दिलेले 156 सदस्य व संस्थानिकांनी नामनिर्देशीत केलेले महत्तम 104 सदस्य असतील. ब्रिटिश प्रांतांचे प्रतिनिधी अप्रत्यक्षपणे निवडून दिले जाती.




2. **फेडरल असेंब्लीचा (Federal Assembly)** : कालावधी 5 वर्षांचा असेल. असेंब्लीमध्ये ब्रिटिश प्रांतांनी निवडून दिलेले 250 सदस्य, तर संस्थानिकांनी नामनिर्देशीत केलेले महत्तम 125 सदस्य असतील. ब्रिटिश प्रांतांचे प्रतिनिधी अप्रत्यक्षपणे प्रांतिक कायदेमंडळाच्या सदस्यांकडून एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या पध्दतीद्वारे निवडून दिले जातील. (दोन्ही सभागृहांतील निवडणूकीची ही व्यवस्था भारताच्या आजच्या घटनेच्या बिलकूल विरुध्द होती.)




- दलित, महिला, कामगार यांच्यासाठी स्वतंत्र मतदार संघाची तरतुद केली गेली.
- 1858 च्या कायद्याने भारतमंत्र्यास सल्ला देण्यासाठी निर्माण केलेली 'इंडिया कौन्सिल' रद्द केली.
- रिझर्व्ह बँक (RBI) स्थापन करण्याची तरतुद होती.

- प्रांतिक लोकसेवा आयोग तसेच दोन किंवा अधिक प्रांतासाठी 'संयुक्त लोकसेवा आयोग' स्थापण्यासाठी तरतुद केली. (शेष अधिकार व्हाईसरॉयकडे देण्यात आले)
- संघराज्यीय न्यायालय स्थापन करण्याची तरतुद होती. यामुळे 1937 ला 'फेडरल कोर्टची' स्थापना करण्यात आली. या फेडरल कोर्टाचे प्रथम मुख्य न्यायाधीश सर मॉरीस ग्वेयर होते.

- **विषय :**

1) केंद्रसुची - 59
2) प्रांतसुची - 54
3) समवर्ती - 36

- राज्यकारभारातील विषयांची केंद्रीय, प्रांतिक व संयुक्त अशा तीन सुचित विभागणी करण्यात आली.
- या कायद्याने मुंबई पासुन सिंध बिहार पासुन उडिसा आणि भारतापासुन बर्मा विभक्त करण्यात आले.
- **या कायद्यावर केलेल्या काही टिका :**

1. **पंडित नेहरु -** 1935 चा कायदा म्हणजे ''एक प्रबळ ब्रेक्स असलेले मात्र इंजिनच नसलेले एक मशिन' आहे.
2. **पंडित मदन मोहन -** मालवियांच्या मते - हा नवीन कायदा आपल्यावर लादला जात आहे. तो वरकरणी काहीसा लोकशाहीवादी दिसत आहे, मात्र आतून पूर्णपणे पोकळ आहे.''
3. **सी.राजगोपालाचारी -** यांनी नवीन घटनेला ''द्विशासनापेक्षा खराब'' असे संबोधले.
4. **बॅ. जीना -** ''संपूर्णपणे कुजलेला, मूलभूतरित्या अयोग्य आणि पूर्णपणे अस्विकाहार्य'' आहे.

## विशेष फरक

| 1909 | 1919 | 1935 |
|---|---|---|
| | | |

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

# प्रकरण - 3 महत्वाचे गव्हर्नर

## वॉरेन हेस्टींग्ज 1773-1785 (साधारणपणे 12 वर्ष)

## लॉर्ड कॉर्नवॉलिस (1786 ते 1793)

## लॉर्ड रिचर्ड वेलस्ली (1798 ते 1805)

## बेंटीक विल्यम (1828 ते 1835)

## लॉर्ड डलहौसी (1848 ते 1856)

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

## लॉर्ड मेयो (1869 ते 1872)

## लॉर्ड लिटन (1876 ते 1880)

## लॉर्ड रिपन

## लॉर्ड कर्झन (1899-1905)

## लॉर्ड मिंटो (1905ते 1910) (दुसरा)

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

# प्रकरण - 4 रयतवारी जमिन महसुल व्यवस्था

- **ब्रिटिशपुर्व महाराष्ट्रातील जमिन महसुल व्यवस्था :**

➢ महाराष्ट्रामध्ये पेशवाईच्या सुरुवातीला काही स्थित्यंतरे झाली, परंतु जमीन महसुलाची पध्दत सन 1758 पासुन सुस्थितीत करण्यात आली.

➢ 1761 नंतर माधवराव पेशव्यांनी कमालधारा पध्दती लागु केली, माधवरावांनी राज्याचा महसुल वाढावा यासाठी ही पध्दत लागु केली होती, परंतु महसुल गोळा करण्यासाठी जुन्याच वतनदारांची, देशमुखांची नेमणुक केल्याने फारसा महसुलामध्ये बदल झाला नाही.

➢ पुढे परशुराम परांजपे आणि रघुनाथ बर्वे यांनी नाना फडणीसाच्या आदेशावरुन रत्नागिरी, अंजनवेल सारख्या कोकणातील काही भाग मोजुन प्रतवारीप्रमाणे जमिनीचा सारा निश्चित केला.

➢ हा सारा कधी कधी 'कमाल धारा' तर कधी-कधी 'तनखा पध्दतीने' वसुल केला जाई.

➢ सन 1818 पर्यंत जमिन महसुलाचे दर कमी अधिक-प्रमाणात असेच राहिले.

| **मराठेशाहीतील महसुल व्यवस्था** | **दुसऱ्या बाजीराव (पेशवेकालीन) महसुल व्यवस्था** |
|---|---|
| महसुल ठरवताना सक्षम पीक पहाणी करौणच महसुल ठरवला जाई. | या काळात 'लिलाव पध्दत' सुरु करण्य्त आली. |
| महसुल रोख किंवा वस्तुरुपाने गोळा केला जाई. | जो कोणी जास्त बोली लावेल त्यास महसुल गोळा करण्याचे अधिकार दिले गेले. |
| नैसर्गिक आपत्तीने पीक न आल्यास शेतकऱ्यांचा महसुल माफ केला जाई. | मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची पिळवणुक होण्यास सुरुवात झाली. |

➢ ज्यावेळी पेशव्यांची सत्ता ऍफिस्टनने हस्तगत केली, त्यावेळी महाराष्ट्रामध्ये कोणत्या प्रकारची जमिन महसुल पध्दत लावावी, त्यातुन 'रयतवारी पध्दत' समोर आली.

- **रयतवारी पध्दतीची पार्श्वभुमी :**

➢ बंगाल प्रांतात कॉर्नवालीसने सुरु केलेल्या कायमधारा पध्दती मधुन वाढलेला महसुलाचा वाटा कंपनीला मिळत नसल्याने रयतवारी पध्दतीचा उदय झाला.

➢ **पहिला प्रयोग :**

✔ मद्रास प्रांतामध्ये कॅ.रिड यांनी सर्वप्रथम बारमहल जिल्ह्यात ही पध्दत लागु केली.

✔ थॉमस मन्रोच्या मदतीने कॅ.रिडने उत्पन्नाचा अंदाज बांधुन उत्पन्नाच्या 50 टक्के भुमिकर निश्चित केला.

✔ नंतरच्या काळामध्ये मद्रासचे गव्हर्नर थॉमस मन्रो यांनी ती संपुर्ण मद्रास प्रांताला लागु केली.

✔ ही पध्दत कायमधारा पध्दती प्रमाणे कायमस्वरुपी नव्हती. तर ती फक्त तिस वर्षांसाठी लागु होती.

✔ रयतवारी पध्दतीत भुमीकराची रक्कम रोख स्वरुपात द्यावी लागत असे.

- **बॉम्बे प्रांतातील रयतवारी पध्दत :**

➢ जमिनीच्या महसुलाच्या बाबतीत रयत (प्रजा) आणि सरकार यांचा प्रत्यक्ष संबंध असणारी पध्दत ही रयतवारी पध्दत म्हणुन ओळखली जाते.

➢ बॉम्बे प्रांतात माऊंट एलफीस्टनने ही पध्दत सर्वप्रथम लागु केली.

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

## रयतवारी पध्दतीबाबत सरकारची भुमिका

- **जमिनदारी पध्दतीस पायबंद घालणे :**

➢ कायमधारा पध्दतीमध्ये जमिनीची मालकी जमिनदारांकडे होती, पुढे जेम्स मिल सारख्या विचारवंतांनी, भारतातील शेती व्यवसाय सुधारण्यासाठी प्रत्यक्ष शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यास जमिनीचे मालकी हक्क देणे बंधनकारक केले पाहिजेत असे मत मांडले.

- **कायमधारा पध्दतीमधील दोष दुर करणे :**

➢ कायमधारा पध्दतीमध्ये फक्त जमिनदारांचे हित साधले जात होते. अतिरिक्त मिळालेल्या महसुलात कंपनीला वाटा मिळत नसे. त्यामुळे कंपनीने 1809 साली 'सिलेक्ट कमिटी' स्थापन केली, या समितीने 'कायमधारा पध्दती' वस्ती ताशेरे ओढले.

➢ समितीने रयतवारी पध्दती अंमलात आणावी यासारखा विचार प्रकट केला.

- रयतवारी पध्दतीवरती जेम्स मिल आणि थॉमस मन्रो यांसारख्या विचारवंतांचा प्रभा होता.
- सरकारचा जनतेशी संपर्क वाढवण्यासाठी सरकारने अल्पसंख्या जमिनदारांशी संबंध ठेवण्यापेक्षा हजारो जनतेशी रयतवारी पध्द्तीमुळे संपर्क ठेवणे मान्य केले.

- **रयतवारी पध्दतीचे गुण :**

➢ जमिनदार पद रद्द केल्याने शेतकऱ्यांचा थेट संपर्क सरकारशी येवु लागला.

➢ जमिनीची मालकी शेतकऱ्याकडे असल्याने ते स्वतःहा मालक बनले, त्यांना जमिन विक्ण्याचा, गहाण ठेवण्याचा किंवा जमिन हस्तांतरित करण्याचा अधिकार होता.

➢ या पध्दतीमध्ये महसुल निश्चित होता.

➢ नैसर्गिक आपत्तीमध्ये सरकार शेतसारा माफही करत असे.

- **रयतवारी पध्दतीचे तोटे :**

➢ शेतमालक व कुळ असे नविन वर्ग निर्माण झाले.

➢ जमिनदार वर्ग नव्याने निर्माण झाला.

➢ कुळांची प्रतिष्ठा कमी झाली.

➢ खेड्यांची एकात्मता नष्ट होवुन समाजाचे विघटन झाले.

➢ दिलेल्या वेळेत शेतसारा न भरल्यास उपाशी ठेवणे, शौच्चास जाऊ न देणे, म्हशीच्या किंवा गाढवाच्या शेपटीला त्या व्यक्तीचे केस बांधणे तसेच गळ्यात हाडांचे हार घालणे अशा अपमानास्पद शिक्षा दिल्या जात असे.

➢ शेतसारा भरण्यास अक्षम असलेलेल शेतकरी सावकरांच्या विळख्यात सापडले.

➢ कर प्रत्येक जमिन क्षेत्रावर होता, शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेल्या संपुर्ण क्षेत्रावर नव्हता.

➢ शेतकऱ्यांना न्यायालयात अपील करता येत नव्हते.

➢ **महत्वाचे :** 1828 साली 'दि रेव्हेन्यु सर्व्हे ॲण्ड असेसमेंट ऑफ दि डेक्कन' या नावाचे स्वतंत्र खाते प्रिंगेलच्या नेतृवाखाली निर्माण करण्यात आली.

- **प्रिंगेलचा सारा आकारणीचा इंदापुर येथील प्रयोगः**

➢ मराठेशाहीकडुन जिंकलेल्या प्रदेशात, एलफिस्टनने रयतवारी पध्दत सुरु केली. परंतु मराठेशाही मध्ये आणि रयतवारी पध्दतीमध्ये महसुल गोळा करण्याची पध्दत वेग-वेगळी होती. रयतवारीमधील मोजणी व पुर्वीची मोजणी यांमध्ये सुध्दा फरक होता.

➢ त्यामुळे एडवर्ड स्ट्रॅची या एलफिस्टनच्या मित्राने रयतवारी मध्ये बदल करण्यास सांगितले, त्याला अनुसरुन पुण्याचे कलेक्टर रॉबर्ट क्रिथ प्रिंगेल यांच्याजवळ रयतवारीमध्ये बदल करुन त्यास सुधारणा करण्याचे काम सोपिवले.

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

- प्रिंगेल हा डेव्हीड रिकार्डोचा शिष्य होता. तो पुण्याचा कलेक्टर होता. त्याच्याकडे पाबळ व इंदापुर या दोन तालुक्यात रयतवारीचा प्रयोग अवलंबण्याची जबाबदारी होती.
- प्रथमतः त्याने इंदापुर तालुक्याची निवड केली. त्यासाथी 1828 ला 'दि रेव्हेन्यु सर्व्हे ॲण्ड असेसमेंट ऑफ दि डेक्कन' या नावाचे स्वतंत्र खाते प्रिंगेलच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आले.
- जमिन मोजुन शेतसारा ठरवण्यासाठी 12 ब्राम्हणांच्या नेमणूका करुन हुजुर कचेरी नावाचा विभाग सुरु केला. या हुजुर कचेरीचे दप्तर सांभाळणे व भाषांतरासाठी सिध्देश्वरशास्त्री टोकेकर यांची नियुक्ती करण्यात आली.
- प्रिंगेल मोजलेल्या जमिन पध्दतीमधुन शेतसारा एकुण उत्पन्नाच्या 55 टक्के ठरवण्यात आला.
- **1828-1829 :** शेतसारा ठरवण्याचा प्रिंगलचा इंदापुर प्रयोग प्रथम इंदापुर जुन्नर, पाबळ, भिमथडी, खेड आणि पुरंदर या ठिकाणी लागु केली.
- या पध्दतीचा प्रभाव तत्कालीन बॉम्बे प्रांताचे गव्हर्नर सर जॉन माल्कम यांवर पडला होता.

- **प्रिगेलच्या पध्दतीचे अपयश :**

- जमिन मोजणीसाठी व महसुल ठरवण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या हुजुर कचेरीमधील सिध्देश्वरशास्त्री टोकेकर याने विश्वासघात केला.
- स्थानिक अधिकाऱ्यांनी जमिनीची प्रतवारी ठरवताना स्वताःच्या स्वार्थासाठी अनेक चुका केल्या. त्यामुळे शेतसाऱ्याचा अंदाज कोणालाच आला नाही.

- **प्रिंगेलच्या पध्दतीचे फायदे :**

1) जमिन मोजण्यासाठीचे एकर हे इंग्लंडमधील माप महाराष्ट्रामध्ये सुरु झाले.
2) जमिनीची किंमत हा आधार जमिन महसुल ठरवताना घ्यावा हे ठरविले.
3) जमिनीवरचे इतर कर रद्द करुन जमिन महसुल एकमेव कर आकारला जावु लागला.

- **इंदापुर/प्रिंगेलच्या नंतर महसुल व्यवस्थेत झालेले बदल :**

- **1836 :** गोल्डस्मिथ व विंगेट अधिकाऱ्यांनी मोहोळ व माढा तालुक्यांची पाहणी केली आणि 30 वर्षासाठी सारा वसुलीच्या शिफारशी केल्या.
- **1867 :** फ्रान्सीस व वॅडिंटन या दोघा अधिकाऱ्यांनी इंदापुर तालुक्याची पुन्हा पाहणी केली.
- **1836 :** या अधिकाऱ्यांनी वाढवलेल्या शेतसाऱ्याविरुध्दात पुढे दख्खनचे दंगे झाले.

## दख्खनचे दंगे

- 12 मे 1875 - उठावाला सुरवात झाली. (सुपे)
- 15 जुन 1875 - शेवटचा उठाव भिमथडी येथील 'मुंधाळी' गावात झाला. यानंतर 22 जुलैला निमभट व 28 जुलैला कान्हाटी या ठिकाणी उठाव.
- शिरुर-कर्धे - 1874 - कल्लुराम सावकार विरुध्द बाबासाहेब देशमुख यांचे घर पाडले गेले.
- गाववाल्यांनी कल्लुराम सावकारावर बहिष्कार टाकला.
- **इंदापूर कळस (फेब्रुवारी 1875) -** बाहेरच्या सावकारांकडुन कोणत्याही शेतकऱ्याने कर्ज घेऊ नये अशी नियमावली तयार केली.
- शेतकऱ्यांनी गावात किराणा दुकान सुरु केले.
- दख्खनच्या दंग्यामध्ये सावकारांविरुध्द नियमावली कळस या गावाने तयार केली.
- कळस शेजारील अकोले गावाने कळस गावातील सावकरांना मदत केली.
- **12 मे 1875 -** सुपे या गावात शेतकऱ्यांनी उठाव केला.
- कर्जे घेतलेली कागदपत्रे जाळली खतावणीजाळल्या. (खत फोडीचे बंड म्हटले जाते.)

# डेक्कन राईट्स कमिशन

- **डेक्कन राईट्स कमिशनचे अध्यक्ष - J.B richey आणि सदस्य :** Lyon, Shamboo Prasad, Kolvin
- या रिपोर्टने गुन्हेगार सावकारांना ठरवण्यात आले.
- **चाल्सवर्थ निल -** 'Myth of Deccan Riots' फक्त सावकार जबाबदार नाही. ब्रिटिश महसुल व्यवस्था जबाबदार.
- या काळात दुष्काळ पडले असताना सुध्दा टॅक्स दर बदलले नाही.
- टॅक्स न भरल्यामुळे जमिनी ताब्यात घेणे 'दख्खनच्या दंग्यांना' कारणीभुत ठरल्या.
- **सर ऑक्लंड कॉलवील -** शेतकऱ्यांची पुर्वपार चालत आलेली कर्ज काढण्याची पध्दत व ते न फेडण्याची प्रवृत्ती.
- शेतकरी व सावकार यांच्यातील संबंध बिघडले.
- निल चाल्सवर्थ ने विरोध केला.
- **प्रा. रविंद्र कुमार -** पुर्वे जमिन महसुलासाठी शेतकरी हा वैयक्तिकरित्या जबाबदार नसे. पाटील व संपुर्ण गाव जमिन महसुलासाठी जबाबदार असे.

➢ **प्रा.एस. सी.लक्ष्मी लाल यांनी उठावाची कारणे पुढील प्रमाणे दिली आहेत :**

1) महसूलाची आकारणी वाढीव दराने झाली
2) शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढला.

- महसुलाची आकारणी वाढीव दराने झाली.
- शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढला.
- कॅटनॅचने या उठावाची तुलना 19 व्या शकतकामधील बंगाल व बिहारातील उठावाशी केली आहे. उदा. 1855 संताळ चा उठाव व 1871 ची खारवार चळवळ होत. 1875 ते 1900 या काळातील बिरसा चळवळीशीसुद्धा त्यांनी तुलना केला आहे. हा उठाव मध्यमवर्गीय शेतकऱ्यांनी केला आहे. उठावाची तुलना 19 व्या शतकातील बंगाल व बिहारातील उठावाशी केली.
- प्रो. रणजित गुहाच्या मते, हा उठाव मुख्यतः शेतकऱ्यांनी आपले शोषण करणाऱ्यांच्या विरूद्ध केला नव्हता. तर सावकारांना निशस्त्र करणे हा त्यांचा प्रधान हेतू होता. त्यांनी सावकारांचे बॉन्डस व हिशोबाची कागदपत्रे जाळली. सन 1830 मध्ये इंग्लंडमधील झालेल्या डुलपस चळवळी सारखा हा उठाव होता. प्रो. ब्रम्हानंद हे म्हणतात की 1875 शेतकरी उठाव किंवा चळवळ यांचे स्वरूप मर्यादीत नव्हते. सन 1875 पूर्वी झालेल्या उठावाशी यांचा संबध आहे. या उठावाला खेड्यातील सर्व जनतेनी पाठिंबा दिला. व काही वेळा सर्व जातीच्या लोकांनीही सक्रीय पाठिंबा दिला. 'Elementery Aspects of Peasant insurgency in Colonial India'
- यांच्या मते, हा उठाव मुख्यतः शेतकऱ्यांने आपले शोषण करणाऱ्यांच्या विरुध्द केला नव्हता तर, सावकरांना निशस्त्र करणे हा त्यांचा प्रधान हेतु होता.
- 1830 मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या 'डुपलस' चळवळी सारखा होता.
- 1875 शेतकरी उठाव किंवा यांचे स्वरुप मर्यादीत नव्हते.
- 1875 च्या पुर्वी झालेल्या उठावाशी संबंध आहे.
- पुण्यातील सार्वजनिक सभेने या उठावाविषयी पुढील मुद्दे मांडले

1) खेड्यामध्ये पूर्वी सहजा न दिसलेली एकी दिसून आली.
2) हा उठाव पुणे, अहमदनगर, सोलापूर, सातारा इ. जिल्ह्यात होता
3) ज्या ठिकाणी जमाबंदीचे नवे दर लागू केले होते तेथे मोठ्या प्रमाणात उठाव झाले.

NOTES

सेवेसाठी ज्ञानार्जन

# प्रकरण - 5 दळणवळण

## रेल्वे

## रस्ते सुधारणा

## तार (टेलिग्राफ)

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

## अंतर्गत जल व सागरी वाहतुक

## हवाई वाहतुक

रयत प्रबोधिनी
सेवेसाठी ज्ञानार्जन

# प्रकरण - 6 धार्मिक सुधारणा चळवळ

## ब्राम्हो समाज

- राममोहन बॅनर्जी ऊर्फ राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केली. वेद व उपनिषदे हे ब्राह्मो समाजाचा आधार होते.
- **ब्राह्मो समाजाचे तत्त्वज्ञान:**
  - परमेश्वर एक असून एकेश्वरवाद हाच सत्याचा मार्ग आहे.
  - सर्वधर्मीयांबद्दल बंधुभाव असावा.
  - पूजा-अर्चा यांना विरोध करावा.
  - व्यक्तीने प्रपंचास परमार्थरूप मानून प्रपंच चालवावा.
  - प्रेम सेवा, परोपकार हाच धर्माचा खरा अर्थ होय, म्हणून एकमेकांशी व्यवहार करावा.
  - ब्राह्मो समाजाचे कार्य

- **ब्राह्मो समाजात फूट १८६६:**
  - देवेंद्रनाथ टागोरांच्या नेतृत्वाखाली आदी ब्राह्मो समाज
  - केशवचंद्र सेनच्या नेतृत्वाखाली भारतीय ब्राह्मो समाज

- **भारतीय ब्राह्मो समाजाचे कार्य / केशवचंद्र सेनचे कार्य:**
  - स्त्री -सुधारणेला उत्तेजन देणे.
  - शैक्षणिक सुधारणा व नैसर्गिक आपत्तीप्रसंगी आर्थिक पुरवठा
  - सामाजिक सुधारणा

- **भारतीय ब्राह्मो समाजात फूट**:
  - केशवचंद्र सेनच्या नेतृत्वाखाली नवविधान पंथाची स्थापना.

- **साधारण ब्राह्मो समाज** :
  - शिवनाथ शास्त्री, आनंद बोस, शिवचंद्र बोस, उमेशचंद्र दास यांच्या नेतृत्वाखाली

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

## मानव धर्मसभा

- या सभेचा प्रार्थना दिवस रविवार होता.
- दादोबा पांडुरंग यांचे नोकरीनिमित्त काही काळ सुरत येथे वास्तव्य होते. तेथे त्यांचा दुर्गाराम) मंछाराम मेहता, दिनमणी शंकर दलपतराय, मोतीराम दलपतराय व दामोदर दास या तरुण मित्रांशी घनिष्ठ संबंध आला.
- त्या सर्वांनी मिळून २२ जून १८४४ रोजी 'मानवधर्म सभा' या संस्थेची स्थापना केली.
- या संस्थेचे **अध्यक्ष** म्हणून **दादोबा पांडूरंग** यांची तर **कार्यवाह** म्हणून **दुर्गाराम मंछाराम** यांची निवड झाली.

- **सभेचे तत्वज्ञान** :
  - ईश्वर एकच असून त्याची सर्वांनी भक्ती करावी.

- खरा धर्म हा ईश्वरनिष्ठेमध्ये आहे, निष्ठा ही प्रेम व नैतिक वर्तन यावर अवलंबून आहे.
- सर्व जगताचा एकच धर्म आहे. तो म्हणजे मानवधर्म होय.
- मनुष्याचे श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व गुणावरून ठरवावे, कुळावरून नव्हे.
- सर्वांनी विवेकाने वागावे.
- सर्वांना सन्मार्गाचे व सदाचाराचे शिक्षण द्यावे.
- परमेश्वर प्राप्तीसाठी भक्ती करावी.

- **सभेचे ब्रीदवाक्य** :
- जातिभेद न पाळणे हे या संस्थेचे ब्रीदवाक्य होते.

## परमहंस सभा

- **सभेचे अध्यक्ष** : राम बाळकृष्ण जयकर
- **अहमदनगर शाखेचे अध्यक्ष** : कासिमभाई ढालवानी
- **पुणे शाखेचे अध्यक्ष** : केशवराव भवाळकर (सावित्रीबाई फुले यांचे शिक्षक)
- दादोबा पांडूरंग यांची 'मानवधर्म सभा' फार काळ चालली नाही तथापि तेवढ्यावरून नाऊमेद न होता.
- दादोबा पांडूरंग आणि त्यांचे काही सहकारी यांनी सन १८४९ मध्ये मुंबई येथे 'परमहंस सभा' किंवा 'परमहंस मंडळी' नावाची दुसरी संस्था स्थापन केली. या सभेच्या स्थापनेत दादोबा पांडूरंग यांचाच पुढाकार होता.
- भाऊ महाजन, आत्माराम पांडूरंग या सुधारकांचाही या संस्थेच्या स्थापनेस हातभार लागला.
- दादोबा पांडूरंग यांना या संस्थेला 'परमहंस' हा शब्द सुचविण्यामागे हंसाची उपमा लक्षात आली असावी, हंस ज्याप्रमाणे पाणी आणि दूध अलग करतो त्याप्रमाणे ही सभा कार्य करील अशी दादोबा पांडूरंग यांची कल्पना असावी.

- **सभेची उद्दिष्टे :**
- जातिसंस्था नष्ट करणे. **(जास्त भर)**
- मूर्तिपूजेला विरोध करणे.
- पुनर्विवाहाला उत्तेजन देणे.
- स्त्री शिक्षणाला प्राधान्य देणे.
- दलित वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे ही या संस्थेची प्रमुख उद्दिष्टे होती.
- दादोबा पांडूरंग यांनी या संस्थेच्या सभासदासाठी 'धर्म विवेचन' आणि 'परमहंसिक ब्रह्मधर्म' या दोन पुस्तिका लिहिल्या होत्या.

- **संस्थेची कार्यपद्धती** :
- प्रार्थनेनंतर सर्व सभासद सहभोजन घेत. या सहभोजनाचे अन्न अस्पृश्य आचाऱ्याने बनविलेले असे. तसेच ख्रिस्ती माणसाने बनविलेला पाव खाल्ल्याशिवाय आणि मुसलमान माणसाने आणलेले पाणी प्यायल्याशिवाय कोणालाही या सभेचे सभासद होता येत नसे; अशी माहिती परमहंस सभेचे एक सभासद डॉ. रामकृष्णपंत भांडारकार यांच्या एका भाषणात आढळते.

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

- अक्रुराने गोपिकास शिकवलेले ब्रह्मज्ञान – बाबा पदमनजी
- सभेवरती टीका (रामकृष्ण अनंत जोशी उर्फ गुजाबा जोशी) परमहंस मत प्रशंसा

- **सभेच्या अपयशाचे कारण :**
- सभेचे बोजड तत्वज्ञान
- सभेचे कार्यातील गुप्तता व ख्रिस्ती वळणाचा दीक्षा विधी
- धैर्य, जबाबदारी व गांभीर्य या गुणांचा सभासदांनमध्ये असलेला अभाव
- मर्यादित कार्यक्षेत्र

## इतर महत्वाचे

- १८५३ – मधील गिरगावची सभा डॉ. रा.गो. भांडारकर यांच्या नेतृत्वात झाली.

### परमहंस सभेचे महत्वाचे सभासद

- **काही महत्वाचे :**
- ल.न. जोशी, ना.बा. पटवर्धन, बा. बा. भागवत – एल्फिस्टन स्कुल मुंबई
- केशवराव भवाळकर – पुणे
- वा.भी. करमरकर – सोलापूर
- बा.म. आदूरकर – नागपूर
- ना.रा. दातार-जमखंडी
- पु.ज. काणे, दीक्षित – रत्नागिरी
- विष्णुपंत जांभेकर – धुळे
- रामचंद्र गावडे – ठाणे
- अचयुत हरी – जमखंडी

## प्रार्थना समाज

- १८६४ मध्ये ब्राह्मोसमाजाचे नेते केशवचंद्र सेन मुंबईत आले होते. ते समाज सुधारणेचे कट्टर पुरस्कर्ते होते. त्यांनी मुंबईत दिलेल्या व्याख्यानांनी येथील समाजसुधारकांना नव्याने प्रेरणा मिळाली. त्यांनी आता धर्मसुधारणेचे व समाजसुधारणेचे कार्य नव्याने हाती घेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या.
- त्याचा दृश्य परिणाम म्हणजे प्रार्थना समाजाची स्थापना होय. डॉ. आत्माराम पांडुरंग यांनी पुढाकार घेऊन ३१ मार्च १८६७ रोजी मुंबई येथे प्रार्थना समाजाची स्थापना केली.
- सुरुवातीला या संस्थेला 'एकेश्वर भक्तमंडळी' असे नाव होते.
- डॉ. पांडूरंग यांच्याखेरीज दादोबा पांडूरंग, बामन आबाजी मोडक, न्या. चंदावरकर, न्या. म. गो. रानडे व डॉ. रा. गो. भांडारकर इत्यादी विचारवंतांचाही या संघटनेत सहभाग होता.
- **डॉ. आत्माराम पांडूरंग हे या सभेचे पहिले अध्यक्ष बनले.**
- १८६८ साली केशवचंद्र सेन यांनी मुंबईला दुसरी भेट दिली व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यामुळे प्रार्थना समाजाच्या कार्याला बळकटी आली.
- **स्थापना -** पापमोचनी एकादशीच्या दिवशी (31 मार्च 1867)

रयत प्रबोधिनी

- 17 डिसेंबर 1866 (पहिली सभा झाली) आत्माराम पांडुरंग यांच्या घरी
- **उपस्थित** : बाळ मंगेश वागळे, नारायण महादेव परमानंद (मामा परमानंद), वासुदेव बाबाजी नवरंगे
- **अनुपस्थित** : दादोबा पांडुरंग तर्खडकर, राम बाळकृष्ण जयकर (स्वर्गवासी)
- डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांच्या नेतृत्वाखाली डॉ. रामकृष्ण भांडारकर, न्या. रानडे, दादोबा पांडुरंग, सर नारायण चंदावरकर, वामन मोडक यांनी प्रार्थन समाजाची स्थापना केली.

- **प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान:**
  - परमेश्वर एक असून विश्वाचा निर्माता आहे.
  - परमेश्वर जगन्नियंत्रक, अनंतरूपी, सर्वशक्तिमान, पापनाशक, पालनकर्ता असल्याने शरण गेल्यास इहलोकी सुख प्राप्त होते.
  - परमेश्वराच्या प्रार्थनेमागे भौतिक फलाची अपेक्षा धरू नये.
  - परमेश्वराची पूजा करणे अयोग्य आहे. कारण तो सगुण आहे.
  - सर्व मानव परमेश्वराची लेकरे आहेत. सर्वांनी बंधुभावाने वागावे.

- **प्रार्थना समाजाचे कार्य:**
  - १८७६ मध्ये भिकोबा लक्ष्मण चव्हाणांनी मुंबईत पहिली रात्रशाळा चालू केली.
  - १८७५ मध्ये उमीया शंकर लालशंकर यांनी अनाथ मुलांसाठी पंढरपूरला अनाथाश्रम सुरू केले. दुष्काळाची विविध कामे (१८७६-७७) हाती घेऊन लोकांना मदत केली.
  - प्रतापचंद्र मुजुमदारांनी व डॉ. सखाराम अर्जुन यांनी स्त्री शिक्षणासाठी धडपड केली.
  - रानडेंनी १८८२ ला पुण्यात मुलींची शाळा सुरू केली. पंडिता रमाबाईंनी आर्य महिला समाज सुरू केला. प्रार्थना समाजाच्या महिला कार्यकर्त्यांनी मदत दिली.
  - १९०१ मध्ये सर नारायण चंदावरकरांची कन्या सौ. शिरूरने मुंबईत सामाजिक परिषदेचे अधिवेशन घेतले.
  - विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' सुरू करून दलितांसाठी कार्य केले. १९०१ मध्ये दलितांकरिता व्यापक कार्याची योजना केली.
  - भिकोबा चव्हाणने वासुदेव बाबाजी नवरंगेशी काशीबाई या विधवेचा विवाह घडवला.
  - डॉ. आत्माराम पांडुरंग व नारायण महादेव परमानंद यांनी स्त्रीचे विवाहाचे वय २० असावे हे स्पष्ट केले.
  - जनसामान्यांचा नैतिक स्तर उंचावण्यासाठी 'ब्राह्मो पोस्टल मिशन' व 'संगतसभा द्वारा प्रयत्न केले. संत तुकारामांच्या गाथा गायनातून धार्मिक-सामाजिक प्रबोधन केले.

### इतर महत्वाचे

- प्रार्थना समाजास 'जुन्या भागवत धर्माची शाखा' कोण म्हणत - न्या.  रानडे.
- प्रार्थना समाजास घोषवाक्य - न्या. रानडेंनी दिले. - "Love of God, in the Service of Man"

## सत्यशोधक समाज (२४ सप्टेंबर १८७३)

- सत्यशोधक शब्द - बाबा पदमनजी यांच्या कडून आला. - काही इतिहास करांचे मत
- १८७२ - गुलामगिरी हा ग्रंथ लिहिला. - अमेरिकन निग्रोना अर्पण

- एकमय लोक - संकल्पना - महात्मा फुलेंनी वापरली.

- **प्रेरणा :**

➢ ज्ञानगीरी बुवा
➢ कबीराच्या 'बिजक' ग्रंथातील विप्रमती प्रकरणाचा प्रभाव :
➢ वज्रसुचीच्या ग्रंथाचा प्रभाव
➢ प्रमाणग्रंथ - सार्वजनिक सत्यधर्म

- **स्थापनेत उपस्थित सदस्य :**

➢ ज्ञानगिरी बुवा (मराठवाडा), धोंडीराम कुंभार, रामशेठ उरवणे, बापूजी हरी शिंदे (विदर्भ), ग्यानोबा झगडे, रामचंद्र भालेकर, कृष्णराव भालेकर, तुकाराम हणमंता पिंजन इ. सहकारी उपस्थित होते.
➢ **घोषवाक्य :** सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्थी ॥
➢ **पहिले अध्यक्ष** - जोतीराव फुले
➢ **कोषाध्यक्ष** - जोतीराव फुले
➢ **पहिले कार्यवाहक** - नारायण गोविंद कडलक

- **सत्यशोधक समाजाची मुख्य तत्त्वे :**

➢ "ईश्वर एकच असून तो निर्गुण-निराकार आहे." सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत.
➢ परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवाला अधिकार आहे.
➢ परमेश्वराची भक्ती करण्यास मध्यस्थाची गरज नाही. तेव्हा कोणत्याही व्यक्तीला पुरोहित वर्गाच्या मध्यस्थीविना आपल्या प्रिय परमेश्वराची उपासना करता येते. माणसाला जातीने नव्हे तर गुणांनी श्रेष्ठत्व प्राप्त होते.
➢ पुनर्जन्म, कर्मकांड, जपजाप्य इ. गोष्टी अज्ञान मूलक आहेत व त्या कनिष्ठ वर्गाच्या पिळवणुकीचे कारण आहेत.
➢ कोणताही धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित नाही. सर्व धर्मग्रंथाची निर्मिती मानवानेच केली आहे.
➢ फुलेंच्या निधनानंतर २४ मे १८९१ सत्यशोधक समाजाचे नामांतर 'सत्यधर्म समाज' असे करण्यात आले.
➢ अध्यक्ष - विश्राम रामजी घोले.
➢ चिटणीस - हरिचंद्र नवलकर
➢ वृत्तपत्र - सत्यप्रकाश
➢ भालेकर व लोखंडे या कामात सहभागी झाले नाहीत.
➢ वेदोक्त प्रकरणानंतर ढवळलेले कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १९११ साली सत्यशोधक समाज पुन्हा एकदा रुजवण्याचा प्रयत्न झाला.
➢ ११ जानेवारी १९११ - दिगंबर जैन बोर्डिंग मधील चतुराबाई हॉल मध्ये शाहुंच्या प्रेरणेने समाज पुर्नरुज्जीत झाला.
➢ **कार्यक्रमाचे अध्यक्ष** - परशुराम घोसरवाडकर
➢ **स्थापन झालेल्या समाजाचे अध्यक्ष** - भास्करराव जाधव
➢ **उपाध्यक्ष** - अण्णासाहेब लट्ठे
➢ **कार्यवाहक** - हरिभाऊ चव्हाण

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

- **तत्त्वे :**

➢ जोतीरावांच्या मृत्युनंतर १९११ साली सत्यशोधक समाजाचे ठराव प्रसिद्ध :

१) सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत व देव त्यांचा आईबाप आहे.

२) आईला व बांधवांना भेटण्यास प्रसन्न करण्यास मध्यस्थीची गरज नसते, त्याप्रमाणे देवाला प्रसन्न करण्यासाठी पुरोहित किंवा गुरू ह्यांची आवश्यकता नाही.

३) हे तत्त्व मान्य असल्यास कोणालाही सभासद होता येते.

- **पहिले अधिवेशन –** पुणे स्वामी अय्यावरू (मुंबई सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष)
- **उपस्थित मंडळी –** विठ्ठलराव ढोणे, श्रीपतराव चव्हाण, गोविंदराव जाधव
- **अधिवेशन – १९१२** साली सत्यशोधक समाजाचे दुसरे अधिवेशन पार पडले. - नाशिक - संतुजी लाड
- **सासवड अधिवेशन – १९१४** सावित्रीबाई रोडे (विद्यादेवी), क्षत्रिय रामोशी-वृत्तपत्र

## धर्मसुधारणा चळवळी

| क्र. | समाजाचे नाव | संस्थापक | प्रेरणा | संबंधित व्यक्ती | इतर महत्वाचे | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | ब्राम्हो समाज (1828) | राजा राममोहन रॉय | ब्राम्हसभा ↓ ब्राम्हो समाज | द्वारकानाथ टागोर, ताराचंद चक्रवर्ती कालीनाथ रॉय, रामचंद्र विद्याबगीश देवेंद्रनाथ टागोर, आचार्य केशवचंद्रसेन पंडित शिवनाथ शास्त्री, आनंद मोहन बोस, हेमेंद्रनाथ टागोर, शशिपाद बॅनर्जी | धर्मसभा-राजा राधाकांत देव यंग बंगाल - हेन्री डोरॅजिवो | Friends of Rajaram Mohanroy - चार्ल्सडाल |
| 2. | मानवधर्म सभा (1844) | दादोबा पांडुरंग तर्खडकर | हेन्री ग्रीन | दुर्गाराम मंछाराम, दिनमणी शंकर दलपतराय, मोतीराम दलपतराय, दामोदर दास | 'धर्मविवेचन' ↓ एक जगदासी आर्य | कार्यवाहक - दुर्गाराम मंछाराम |
| 3. | परमहंस सभा (1849) | दादोबा पांडुरंग तर्खडकर | ईश्वरचंद विद्यासागर | राम बाळकृष्ण जयकर (अध्यक्ष) बाबा पदमजी, कासिमभाई दालवाणी, शाहूराव कुकडे, सखाराम शास्त्री, लक्ष्मण शास्त्री हळबे. | गुप्त सभा होती | अहमदनगर शाखेचे अध्यक्ष - कासिमभाई ढालवाणी |
| 4. | प्रार्थना समाज (1867) | आत्माराम पांडुरंग तर्खडकर | केशवचंद्र सेन | मामा परमानंद, बाळ मंगेश वागळे, वामन दाजी मोडक, वासुदेव नवरंगे, न्या.रानडे, लालशंकर उमीयाशंकर, वि.रा.शिंदे, चंदावरकर, | सत्यमेव जयते | एकेश्वर भक्तमंडळी |

रयत प्रबोधिनी सेवेसाठी ज्ञानार्जन

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भांडारकर, गंगुताई भंडारे, रमाबाई रानडे | | |
| 5. | सत्यशोधक समाज (1873) | महात्मा फुले | ज्ञानगिरी बुवा | रामशेठ उरवणे, नारायण कडलग, भालेकर, ना.मे.लोखंडे, व्यंकू कालेवार, स्वामी अय्यावरु, पोलीसानी लिंगू, भास्करराव जाधव, विश्रामरामजी घोले, हरिभाऊ चव्हाण, सदाशिव राव गोवंडे, नानोबा ससाने, कोंढाजी दुबरे पाटील | सार्वजनिक सत्यधर्म<br>कबीर-बिजकग्रंथ - विप्रमती<br>वर्जसुची-तुकाराम तात्या पडवळ<br>सर्व साक्षी जगत्पती त्याला नकोच मध्यस्थी | |
